1) पुढारी पान क्र. 7

दि. 20/02/2023

# वसईकरांचा तहसील कचेरीवर मृत्युंजय महामोर्चा

## प्रलंबित मागण्यांसाठी विविध संघटना, राजकीय पक्षांचे आंदोलन

वसई : पुढारी वृत्तसेवा

वसईकरांच्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य शासनाचे लक्ष वेधण्याकरिता रविवारी वसईत मृत्युंजय महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनामध्ये वसईतील विविध संघटना आणि राजकीय पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी शिवसेनेचे जिल्हा सचिव मिलिंद खानोलकर, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस विजय पाटील, शिवसेनेचे माजी विरोधी पक्षनेते विनायक निकम, शिवसेना जिल्हा संघटक सौ किरण चेन्दवणकर, जनआंदोलन समितीच्या डॉमिनिका डाबरे, आम आदमी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष जॉन परेरा, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष ओनिल आल्मेडा, आरपीआय चे जिल्हाध्यक्ष ईश्वर धुळे, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष हितेश जाधव आदी प्रामुख्याने उपस्थित होते. दुपारी साडेतीन वाजता चिमाजी आप्पा मैदानातून निघालेल्या या मोर्चाचे तहसीलदार कार्यालयासमोर जाहीर सभेत रूपांतर झाले.

वसईतील विविध राजकीय नेते आणि समाजिक कार्यकर्त्यांनी हस्ताक्षर केलेले पत्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी तहसीलदार उज्वला भगत यांना देण्यात आले असून आपल्या या पत्रात अनेक प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी वसईकरांच्या इच्छेविरुद्ध वसईकरांवर लादलेल्या महापालिकेच्या निर्णयाच्या विरोधात वसईकर



जनता रस्त्यावर उतरली आणि अनेक प्रकारचे संघर्ष करीत तात्कालीन सरकारला महापालिकेतून हरित पट्टा असलेली २९ अधिक ६ अशी एकूण ३५ गावे वगळणेबाबत निर्णय घेण्यास भाग पाडले. २९ गावे महापालिकेतून वगळून तात्कालिन सरकारने वसईकर जनतेच्या इच्छा आकांक्षाची पुर्तता करणारा राजकीय निर्णय घेतला. आज हा निर्णय न्यायालयीन प्रक्रियेत अडकला असला तरी तो आपल्या राजकीय इच्छा शक्तीनेच सुटू शकतो असा ठाम विश्वास वसईकर जनतेचा आहे व तो तात्काळ सोडविण्यात यावा.

महापालिका अधिनियमातील कराधान नियमावली नुसार कायदेशीर कार्यपद्धतीचा अवलंब न करता करदात्यांना वाढीव घरपट्टी व शास्तीबाबत त्याचे म्हणणे मांडण्याची संधी न देता त्यांच्यावर प्रचंड कर वाढ महापालिकेने बेकायदेशीरपणे लादलेली आहे. शासनाने वगळलेल्या २९ गावांच्या ग्रामस्थांवर देखील ही कर व शास्ती अन्यायकारकरित्या महापालिकेने लादली आहे ती तात्काळ रद्द करण्यात यावी.

महापालिका स्थापन झाल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या एस.टी.ची परिवहन सेवा बंद होऊन ठेकेदारी पद्धतीवर महापालिका क्षेत्रात महापालिकेची परिवहन सेवा सुरु करण्यात आली आहे. अपुर्या परिवहन सेवेच्या विरोधात शालेय विद्यार्थी आणि शिक्षिका यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये न्यायालयाचे आदेश होऊन देखील वसईकर नागरिकांना परिपुर्ण परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यात महापालिका असमर्थ ठरलेली आहे. त्यामुळे क्षेत्रफळाने व्यापक असलेल्या वसई तालुक्याच्या नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे. म्हणून राज्य परिवहन सेवा तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

६९ गावांच्या पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर होऊन जवळजवळ ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. पाण्याच्या टाक्या देखील संबंधित ठिकाणी बांधण्यात आल्या आहेत. परंतु आज पर्यंत ग्रामीण भागाला त्या योजनेतून महापालिकेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे अशुद्ध आणि क्षारयुक्त पाणी पिऊन ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्याकरिता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा, यांसह अन्य मागण्यांकडे लक्ष वेधले.

2) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरमध्ये 'शिवजन्मोत्सव' उत्साहात

। मीरा रोड : मीरा-भाईंदर शहरातील विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मीरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने काशिमीरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ स्मारकाला पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. तसेच महापालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.




काशिमीरा नाका येथे मराठी एकीकरण समितीच्या वतीने काशिमीरा नाका येथे सकाळी ढोल-ताशा पथकासह, लेझीम, मल्लखांब, विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले. घोडबंदर किल्ला येथेही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सकल मराठा समाज मीरा-भाईंदर या संस्थेच्या वतीने रामदेव पार्क येथे रक्तदान शिबीर, पोवाड्यांचा कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भाईंदर पश्चिम येथील उत्तन, चौक येथे ऐतिहासिक 'जंजिरे धारावी' किल्ल्यावर मोठ्या उत्साहात 'शिवजन्मोत्सव' साजरा करण्यात आला. याशिवाय किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या नरवीर चिमाजी अप्पाच्या स्मारकासदेखील पुष्पहार अर्पित करण्यात आला. विशेष म्हणजे किल्ल्यावर कातकरी (आदिवासी) समाजातील महिलांनी आणि तरुणांनी श्रमदान करून वेगळ्या प्रकारे महाराजांप्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गडप्रेमी उपस्थित होते.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. 20/02/2023

3) लोकमत पान क्र. 5

# रिसॉर्टवर आली अन् अंगठा तोडून बसली

## तब्बल सात तास झाली शस्त्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमधील रिसॉर्टवर सहलीसाठी आलेल्या एका वृद्ध महिलेचा खेळायच्या तुटलेल्या स्लाइडिंगमध्ये अडकून हाताचा अंगठा तुटल्याची घटना घडली आहे. मुंबईतील ग्लोबल हॉस्पिटलच्या निष्णात डॉक्टरांनी सात तास शस्त्रक्रिया करून हा अंगठा पुन्हा जोडला आहे. मात्र रिसॉर्ट मालकाच्या दुर्लक्षामुळे अपघात झाल्याचा आरोप महिलेने केला असून, मांडवी पोलिसांनी रिसॉर्ट मालक आणि व्यवस्थापक या दोघांविरोधात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घाटकोपरच्या आदिनाथ नीलकंठ एनक्लेव्ह येथे राहणारी अंजना गाला (वय ७२) ही वृद्ध महिला २३ जानेवारीला सकाळी विरारच्या मांडवी रिसॉर्टमध्ये शंभरहून अधिक लोकांसोबत पिकनिकसाठी आली होती. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास रिसॉर्टच्या गार्डनमधील लहान मुलांच्या स्लाइडिंगजवळ त्या घसरगुंडीसाठी गेल्या असताना तेथील तुटलेल्या स्लाइडिंगवरून खाली येत असताना त्यांचे अंगठ्याचे बोट त्यात अडकून त्याचा तुकडा पडला. अपघातानंतर तुटलेला अंगठा बर्फामध्ये ठेवत त्यांना तातडीने मुंबईतील परळच्या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये दुपारी चारच्या सुमारास दाखल करण्यात आले. तेथे डॉ. नीलेश सातभाई यांनी सात तास शस्त्रक्रिया करून त्यांचा तुटलेला अंगठा पुन्हा जोडला.



ज्या महिलेसोबत हा अपघात झाला आहे, त्यांचे पती आणि मुलगा डॉक्टर आहेत. शनिवारी तक्रार देण्यासाठी त्या परिवारासह पोलिस ठाण्यात आल्यावर रिसॉर्टमालक आणि व्यवस्थापक दोघांवर निष्काळजीपणाबद्दल गुन्हा दाखल करण्यात. चौकशी आणि सखोल तपासाअंती रिसॉर्ट मालक आणि व्यवस्थापक यांना अटक करण्यात येईल.

- प्रफुल वाघ, पोलिस निरीक्षक, मांडवी पोलिस ठाणे

### चार लाखांहून अधिक झाला खर्च

जवळपास चार लाखांहून अधिक खर्च त्यांना या शस्त्रक्रियेसाठी आला आहे; मात्र याबाबत रिसॉर्ट मालकांनी हात वर केले. लहान मुलांसाठी असलेल्या या स्लाइडवर आणखीही मोठा गंभीर अपघात घडू शकला असता; मात्र रिसॉर्ट मालकांनी त्या स्लाइड बदलण्याकडे आणि त्यांची डागडुजी करण्याकडे साफ दुर्लक्ष केले. अंजना गाला यांनी अखेर मांडवी पोलिस ठाण्यात रिसॉर्टचालक व व्यवस्थापक यांच्याविरोधात शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

4) लोकमत पु. पान क्र. 1

# प्रेमसंबंध तोडल्याने प्रेयसीचा मोबाइल, दुचाकी चोरली

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : शिवीगाळ, भांडण करणाऱ्या प्रियकराशी संबंध तोडणाऱ्या प्रेयसीचा मोबाइल, दुचाकी चोरणाऱ्याला मीरा रोड पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरोधात तरुणीच्या तक्रारीवरून मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल झाला होता.

मीरा रोडच्या शांतिपार्कमध्ये ही तरुणी राहते. ती काशिमीरा भागात नोकरी करते. तिची नोकरीमुळे मोहसीन खान (२३, रा. काशिमीरा) याच्याशी ओळख झाली. त्यानंतर त्यांचे संबंध प्रेमात बदलले. मात्र, मोहसीन हा तरुणीला लहानसहान गोष्टीवरून शिवीगाळ करू लागला. सुरुवातीला तिने त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र हा प्रकार वाढल्याने प्रेमसंबंध तोडले. तरीही मोहसीन तिला भेटण्यासाठी सतत प्रयत्न करायचा. बोलण्यासाठी - भेटण्यासाठी तो जबरदस्ती करू लागला. शुक्रवारीही त्याने तिला संदेश पाठवून भेटायचे असल्याचे सांगितले. ती तरुणी कामावर जाण्यास निघाली असता मोहसीनने तिच्यावर गोकुळ व्हलेज भागातील इमारती बाहेर पाळत ठेवली. तिच्याशी बोलण्याचा त्याने प्रयत्न केला असता कामावर जायला उशीर होतोय, नंतर बोलू असे तिने सांगितले. त्यानंतर त्याने शिवीगाळ करून तिचा महागडा मोबाइल व दुचाकी घेऊन पळ काढला होता. तरुणीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मोहसीनविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

5) पुढारी पु. पान क्र. 1

# काशिमिरा येथील ऑर्केस्ट्रा बारवर धाड

## ५ महिलांसह एकूण १३ जणांवर गुन्हा दाखल

मिरा रोड : काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील नियमबाह्य चालणाऱ्या के नाईट ऑर्केस्टा बारवर पोलिसांनी कारवाई करून काशिमिरा पोलीस ठाण्यात १३ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीतील मुंबई-अहमदाबाद हायवेवर असलेल्या के.नाईट लेडीज सर्व्हिस ऑर्केस्टा बारमधील महिला सिंगर या अश्लिल नृत्य करुन ग्राहकांना आकर्षित करत असल्याची माहिती काशिमिरा पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार सपोनि प्रशांत गांगुर्डे यांनी पोलीस पथकासह छापा टाकला. त्यावेळी बारमध्ये मोठ्या आवाजात हिंदी चित्रपटाचे गाणे सुरू होते. गाण्यावर बारमधील ५ महिला सिंगर या अश्लील अंगविक्षेप नृत्य करुन हॉटेलमधील उपस्थित ग्राहकांना आकर्षित करत होत्या. पोलीस पथकाने ५ महिला सिंगर, १ कॅशिअर, मॅनेजर, १ स्टुअर्ट, १ वेटर, ३ ग्राहक यांना ताब्यात घेण्यात आले. बारची झडती घेतली असता १३,५३० रुपये रोख रक्कम मिळुन आली. बारच्या ग्राहक हॉलमध्ये जेथे ग्राहकांना मद्य व खाद्यपदार्थ दिले जातात तेथे कोठेही सी. सी. टि.व्ही. कॅमेरे लावले नसल्याचे दिसुन आले. के.नाईट लेडीज सर्व्हिस ऑर्केस्टा बारचे व्यवस्थापन दोषी आढळले नाही.

Scanned with CamScanner

६) पुण्यनगरी पान क्र. १०

दि. २०/०२/२०२३

# सागर परिक्रमेच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र, गुजरातमधील बंदरांचा समावेश

## केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री परषोत्तम रूपाला मच्छीमार, मत्स्य शेतकऱ्यांशी संवाद साधणार

। नवी दिल्ली । भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मत्स्यव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्रालयाने सागर परिक्रमेचे आयोजन केले आहे. सागर परिक्रमाचा तिसरा टप्पा गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये १९ ते २१ फेब्रुवारीदरम्यान आखला जात आहे.

सागर परिक्रमेच्या तिसऱ्या टप्प्याला गुजरातमधील सुरतच्या हाजिरा बंदर इथून माध्यमांशी संवाद साधत १९ फेब्रुवारीपासून सुरुवात होत असून, हा प्रवास महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या दिशेने होणार आहे. यादरम्यान, उत्तर महाराष्ट्रातले सातपाटी, वसई, वर्सोवा, ससून गोदी आणि मुंबईतील इतर क्षेत्रात २० आणि २१ तारखेला प्रवास होणार आहे. केंद्रीय मत्स्यव्यवसाय पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्री परषोत्तम रूपाला या परिक्रमेदरम्यान महाराष्ट्रातल्या किनारपट्टी समुदायांना भेट देऊन तिथल्या मच्छीमार आणि मत्स्य शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या प्रवासात त्यांच्याबरोबर देशभरातील भारत सरकारच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे वरिष्ठ अधिकारी, राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ, मत्स्यव्यवसाय सर्वेक्षण, भारतीय किनारपट्टी सुरक्षा, राज्य मत्स्य अधिकारी, मत्स्य शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, अधिकारी आणि वैज्ञानिकांचा समावेश असेल.

> महाराष्ट्राला ७२० किमी लांबीचा किनारा लाभला आहे ज्यात ठाणे, रायगड, बृहन्मुंबई, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच किनारपट्टी जिल्ह्यांचा समावेश होतो. मच्छीमार मंडळी, विक्रेते आणि मत्स्यउद्योग यांचा मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने आर्थिक मूल्य आणि विशेषतः निर्यातीत थेट सहभाग आहे.

या परिक्रमेदरम्यान शिकाऊ मच्छीमार विशेषतः किनारपट्टी भागातील मच्छीमार, मत्स्य व्यावसायिक आणि मत्स्य शेतकरी, युवा मत्स्य उद्योजक यांना प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना, किसान क्रेडिट कार्ड आणि राज्य योजनेशी संबंधित प्रमाणपत्र आणि मंजुरी प्रदान केल्या जाणार आहेत. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना, राज्य योजना, मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधा विकास निधी अर्थात किसान क्रेडिट कार्ड याबाबत शिक्षित केले जाणार आहे. यासाठी प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, व्हिडीओ डिजिटल प्रचार मोहीम आणि जिंगल्सच्या माध्यमातून याला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी दिली जाणार आहे. या योजनांसोबतच सागर परिक्रमेवर मराठीतून गाणेसुद्धा प्रकाशित केले जाणार आहे.

सागर परिक्रमेच्या प्रवासादरम्यान देशाच्या अन्न सुरक्षेसाठी सागरी मत्स्यपालन संसाधनांचा वापर आणि किनारपट्टीवरील मच्छीमार समुदायांचे जीवनमान आणि सागरी परिसंस्थांचे संरक्षण, मच्छीमार समुदायांमधील अंतर भरून काढण्यासाठी आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या उद्देशाने शाश्वत समतोल साधण्यावर भर असणार आहे. मासेमारी करणाऱ्या गावांचा विकास, परिसंस्थेच्या दृष्टिकोनातून शाश्वत आणि जबाबदार विकास सुनिश्चित करण्यासाठी मासेमारी बंदर आणि तळ यासारख्या पायाभूत सुविधांची सुधारणा आणि निर्मिती यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

७) लोकमत पान क्र. ५

# आजारपणाला कंटाळून आत्महत्या

नालासोपारा : आजारपणाला कंटाळून वसईत एका विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. बाभोळा नाका येथील हुसेनी कॉलनीत सुरक्षा रक्षकाचे काम करणाऱ्या विकास परिहार याची पत्नी मनीषा परिहार (२५) हिने शनिवारी सकाळी सोसायटीच्या गाळ्यात राहत असलेल्या घरी फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. गेल्या एक महिन्यापासून मानेची नस दुखत असल्यामुळे तिच्यावर उपचार सुरू होते. या त्रासाला कंटाळून अखेर तिने आत्महत्या केली. वसई पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

८) म.टा.पु. पान क्र. १

# मोबाइल टॉवरच्या साहित्याची चोरी; दोघांना अटक

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

एका नामांकित मोबाइल नेटवर्क कंपनीत काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना मोबाइल टॉवरचे साहित्य चोरल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण विभागाने ही कारवाई केली आहे. या आरोपींनी मुंबईतीलही काही मोबाइल टॉवरच्या साहित्याची चोरी केल्याचे तपासात समोर आले आहे.

भाईंदर पश्चिमेहून रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या पुलावर बसवण्यात आलेल्या व्होडाफोनच्या मोबाइल नेटवर्क कंपनीच्या टॉवरचे काही साहित्य चोरीला गेले होते. या प्रकरणाची तक्रार अनिल साळवी यांनी जवळच्या भाईंदर पोलिस ठाण्यात काही दिवसांपूर्वीच केली होती. त्यावरून गुन्हा दाखल करत, भाईंदर पोलिसांसह गुन्हे प्रकटीकरण विभागाने या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला होता. खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन व्यक्ती मिरा रोड येथील मोबाइल टॉवरचे साहित्य चोरी करण्यासाठी येणार असल्याची माहिती प्रकटीकरण विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार सापळा रचला असता, अक्षय शिंदे व फकीर जेना या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी ते व्होडाफोन कंपनीत टेक्निशियन म्हणून काम करत असून चोरी केलेले साहित्य भाईंदरमधील जिगेश गुप्ता नामक भंगार विक्रेत्याला विकत असल्याची माहिती दिली.

९) लोकमत पु. पान क्र. १

# ट्रकखाली सापडून दुचाकीस्वार ठार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : वरसावे नाक्यावर गुजरातकडून येणाऱ्या भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत दुचाकीचालक कमलेश गडग (२०, रा. मीनाक्षीनगर, काशिमीरा) याचा मृत्यू, तर मागे बसलेला चंदन शर्मा (२८) हा गंभीर जखमी झाला.

पोलिस शिपाई देवेंद्र बिरारी यांच्या तक्रारीवरून ट्रकचालक आबिद खान (२८, रा. हरियाणा) याच्यावर, काशिमीरा पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल झाला आहे. वरसावे नाका येथे ट्रकने दुचाकीला धडक देताच कमलेश हा खाली पडून ट्रकच्या चाकाखाली सापडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

CamScanner
Scanned with CamScanner

१०) म.टा.पु. पान क्र.१ दि. २०/०२/२०२३

# रेतीमाफियांचे धाबे दणाणले

## अवैध रेतीउपशाप्रकरणी मांडवी पोलिसांच्या सात महिन्यांत २० कारवाया

म. टा. वृत्तसेवा, वसई

वैतरणा पूल आणि जुली बेट परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उत्खनन होत असल्याने मांडवी पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. सात महिन्यांपूर्वी नव्याने पोलिस ठाणे स्थापन झाल्यापासून आतापर्यंत या ठिकाणी २० रेती उत्खननांवर पोलिसांनी कारवाया करून ३८ रेतीमाफियांना अटक केली आहे.

विरार पोलिस ठाणे हद्दीतील वाढती गुन्हेगारी आणि लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर या ठाण्यावरील भार कमी करण्यासाठी मांडवी पोलिस ठाण्याची नव्याने निर्मिती करण्यात आली. या हद्दीत वैतरणा नदीपात्र परिसर, खर्डी, खानिवडे हा भाग येतो. या भागात सर्वाधिक रेती उत्खनन करण्यात येत असल्याचे विरार पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांवरून दिसून येते. त्यामुळे विरारमध्ये रेतीमाफियांना लगाम लावण्यासाठी सर्व स्तरांवर प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून कारवाईचा बडगा उगारला जात आहे. मांडवी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांच्या सूचनेनुसार, अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. मांडवी पोलिस ठाणे सुरू झाल्यापासून सात महिन्यांत खर्डी, खानिवडे, वैतरणा याठिकाणी होणाऱ्या अवैध रेती उत्खननावर लक्ष ठेवून २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये रेती उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणारे सक्शन पंप, अवैध बोटींची तोडफोड करून त्यांना जाळून नष्ट केले आहे. अवैध रेती वाहतुकीची साधने, जेसीबी, ट्रक पोलिसांनी जप्त केले आहेत. उत्खननाप्रकरणी दाखल पाच गुन्ह्यांत आतापर्यंत ३५ लाख रुपये एवढा महसुली दंड सरकारच्या तिजोरीत जमा करण्यात आला आहे. तसेच, ३८ रेतीमाफियांना अटकही केली आहे.

### वैतरणा पूल, जुली बेट परिसरात मोहीम

### ३८ रेतीचोरांना अटक; जेसीबी, ट्रक जप्त

### पाच गुन्ह्यांमधून आतापर्यंत ३५ लाखांचा दंड वसूल

“ मांडवी हद्दीत सर्वाधिक रेती उत्खनन होत असल्याने या संदर्भात अधिकाधिक कारवाया करण्यात येत आहेत. अवैध रेती उत्खननावर प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासनातर्फे उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कारवाई अधिक कठोर करण्यात येणार आहे.

– प्रफुल्ल वाघ, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, मांडवी पोलिस ठाणे



### सीसीटीव्ही, बॅरिकेड्स लावून गस्त वाढवणार

वाढत्या रेती उत्खननाच्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, वैतरणा येथे गेल्याच आठवड्यात आढावा बैठक घेऊन अवैध रेती उत्खनन होणाऱ्या परिसराची पाहणी करण्यात आली. या बैठकीत महसूल प्रशासन, पोलिस, आरपीएफ, जीआरपी, मेरीटाईम बोर्ड, रेल्वे, खार भूमी अधीक्षक यांचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बोटीच्या मदतीने समुद्रात जाऊन अर्नाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील असलेले जुली बेट वैतरणा पुलाची पाहणी करण्यात आली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कांदळवन झाडाची कत्तल केल्याचे आढळले. तसेच, अवैध रेती उत्खननामुळे बेटही खचल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रशासनाने परिसरात वॉच टॉवर, सीसीटीव्ही, बॅरिकेड्स लावून गस्त वाढण्याचा निर्णय घेतला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

CMYK

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, सोमवार 20 फरवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

वसई-विरार में लगे सभी मोबाइल टावर अवैध

...पेज-3

ओटीटी पर अपनी शादी दिखाने के लिए तैयार हंसिका मोटवानी

...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन कृष्ण पक्ष अमावस्या | 07.04 am / 06.41 pm | | अधिकतम 34°C / न्यूनतम 23°C | NSE / BSE | Rs. 56,510 Per 10 gm / Rs. 68,600 Per Kg |

# हर्षोल्लास व धूमधाम से मनाया गया छत्रपति शिवाजी महाराज जयंती



**वसई।** छत्रपति शिवाजी महाराज जयंती 19 फरवरी 2023 रविवार को वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय एवं सभी वार्ड समिति कार्यालयों में मनाई गई। गौरतलब है कि वसई-विरार शहर के सामाजिक संस्था व राजनीतिक पार्टियों द्वारा छत्रपति शिवाजी महाराज जयंती बड़े हर्षोल्लास व धूमधाम से मनाया गया। फिलहाल, वीवीसीएमसी मुख्यालय विरार आयुक्त एवं प्रशासक अनिल कुमार पवार ने छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा पर माल्यार्पण कर नमन किया। इस समय महाराष्ट्र राज्य गान आयुक्तों और प्रशासकों के साथ-साथ विविसीएमसी के अधिकारियों और कर्मचारियों द्वारा गाया गया, आयुक्त ने सभी को छत्रपति शिवाजी महाराज जयंती की शुभकामनाएं दी।

Scanned with CamScanner

लोकमत

# दोन जिवंत काडतुसे, गावठी कट्ट्यासह आरोपी जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** संतोष भवन परिसरात एक गावठी कट्टा, दोन जिवंत काडतुसांसह एकाला तुळिंजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी रविवारी दुपारी अटक केली आहे. जियालाल जैस्वाल (४५) असे आरोपीचे नाव आहे. तुळिंज पोलिसांनी गुन्हा दाखल करून ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून हा आरोपी गावठी कट्टा नालासोपारा शहरात कोणाला विकण्यासाठी आला होता याचा तपास करत आहे.

संतोष भवनजवळील स्मशानभूमी येथे एक आरोपी गावठी कट्टा, जिवंत काडतुसांसह उत्तर प्रदेश येथून येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांना मिळाली होती. यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा लावला होता. रविवारी दुपारी एकच्या सुमारास एक संशयित इसम दिसल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतल्यावर एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे सापडली.

> एका आरोपीला शस्त्र व जिवंत काडतुसांसह पकडले आहे. आरोपीला सोमवारी वसई न्यायालयात हजर करणार आहे.
>
> \- शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तुळिंज पोलिस ठाणे



Scanned with CamScanner

लोकमत

# हजारोंचे अमली पदार्थ जप्त

नालासोपारा : येथे मॅफेड्रॉन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आचोळे पोलिसांना यश आले आहे. शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास आचोळे गांधी निर्वाणा बिल्डींगजवळ पोलिसांनी मोहम्मद कुरेशी (४७) व ओके सीमा (५३) या दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३६ हजार रुपये किमतीचा अठरा ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ तसेच मोबाइल फोन व रोख रक्कम असा ५१ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आहे. आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 19, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner